
सकाळ
उदय भविष्यपत्राचा
Sakal Reader Connect Initiative



युथ आयकॉन

# समीर दुधगांवकर



"सर्वांची समृध्दी"
या ध्येयाकडे वाटचाल..

# प्रस्तावना

**"All it takes for evil men to triumph is for good people to sit back and do nothing.. !!! "**

## समीरच्या मार्गदर्शकाचे हे वाक्य ते कायम सांगतात... १९७८ सालचे हे वाक्य...

१९७८ चा समीर...



या वरील वाक्याचा अर्थ असा की, **वाईट लोक जिंकण्यासाठी चांगल्या लोकांनी काहीच न करता बसून राहणे इतकेच होणे फक्त गरजेचे आहे!!..** फक्त वाईट कृत्य करणारे लोक पुढे असतील **तर परभणी लोकसभा क्षेत्राचे चांगले होण्याची ईच्छा असणाऱ्यांनी पुढे येणे,** योग्य कामे स्वतः करणे किंवा काम करणाऱ्या, शिकलेल्या, संस्कारी युवकांना मदत करणे गरजेचे आहे... यातूनच वाईट लोक हळूहळू बाजूला होतील.

**व्यक्तिगत स्वार्थासाठी, पदासाठी परभणीचे सामाजिक जीवन उद्ध्वस्त (उदा. धुळीने माखलेले शहरं, पाणी - रस्ता आदी मुलभूत सोयी-सुविधा नसलेले लोकं, नौकऱ्यासाठी आई वडिलांपासून दूर जावे लागलेले युवक वगैरे वगैरे) करून परभणीतील जनतेची व युवकांची घोर निराशा करणाऱ्यांपेक्षा** एका नवीन टीमची आतुरतेने परभणीतील लोकं वाट पाहत आहेत... येत्या काळात कोण असू शकेल असे व्यक्तिमत्व जे नेतृत्त्व करू शकेल??

विकासासाठी व समाजजीवन सुरळीत बनण्यासाठी योग्य व्यक्तीला मदत व आशीर्वाद देणे, त्यांच्या पाठीशी चांगल्या लोकांनी उभे राहणे परभणीकरांचे ध्येय असावे, असे आम्हाला वाटते. लोकांची नकारात्मक मानसिकता, परभणी विषयीचे भूमिपुत्रांचे तसेच बाहेरील व्यक्तींचे नकारात्मक मत, विकासासाठी फार न करण्याची नेतृत्त्व करणाऱ्यांची वृत्ती या सर्व गोष्टी **आम्ही मागच्या काही वर्षांत खूप जवळून पाहत आहोत, परंतु आता आपल्याला गरज आहे बदलाची...**

## आमचा हात धरून पुढे नेणाऱ्या सळसळत्या युवा नेतृत्त्वाची.. !!

मागच्या कित्येक वर्षांपासून आम्ही परभणी जिल्ह्याच्या विकासाची वाट पाहत आहोत. ज्यांना आम्ही संधी दिली त्यांच्या बुरसटलेल्या जुनाट विचारसरणीने आम्हाला कधी पुढे येऊच दिले नाही.

आधुनिकता तर सोडाच; परंतु रस्ते, पाणी, आरोग्य, उच्चदर्जाचे शिक्षण यासारख्या सामान्य गरजादेखील ते पूर्ण करू शकले नाहीत.

**पण आता बस्स....!!** जितका अन्याय झाला तितका झाला आणि आम्ही तो सहनही केला.

आता आम्हाला गरज आहे **एका अशा नेतृत्त्वाची**, जे आमच्यातीलच एक असावे, भूमिपुत्र असावे...

**एक असे युवा नेतृत्त्व ज्याला** आधुनिकतेची कास आहे. ज्याला माहित आहे की, उद्योगधंद्यांच्या विकासातच आपल्या जिल्ह्याचा विकास दडलेला आहे..

**एक असे कणखर नेतृत्त्व जे** आमचे प्रतिनिधित्व करेल; पक्षाचे नाही..

**एक असे उभरते नेतृत्त्व जे** जिल्ह्याच्या विकासासाठी काम करेल. जे समाजकारण करेल. राजकारण नाही.

**एक असे सुशिक्षीत नेतृत्त्व ज्याला** शिक्षणाची किंमत माहित आहे व ज्या नेतृत्त्वाला राज्य पातळीवर स्वकर्तृत्व असल्यामुळे मान मिळेल.

- आम्हाला नेता नको आहे, **एक असा कार्यकर्ता पाहिजे** जो जिल्ह्याच्या विकासासाठी कार्य करेल.
- आम्हाला मोर्चे नकोत, शांती हवी आहे....
- आम्हाला उपोषण नकोत, धडाडी हवी आहे....

**अशा परिस्थितीत** आम्हाला समीरच्या मागील काही वर्षे केलेल्या वेगळ्या कामांची नोंद घ्यावी लागली...

**समीरभाऊला कित्येक वर्षे आम्ही जवळून ओळखतो आणि असे जाणवले, की वर लिहिलेल्या अपेक्षा ते पूर्ण करू शकतील... काम करताना सर्व गोष्टी योग्य पद्धतीने घडवून आणण्याची धमक त्यांच्यात दिसून आली...**

परभणी लोकसभेत सामाजिक, राजकीय उत्कर्ष व समृद्धी घडविण्यासाठी युवा नेतृत्त्व पुढे करण्याची **आवश्यकता तर आहेच; पण हे चांगल्या विचाराच्या लोकांना समीरभाऊसारख्या शिक्षित, युवा, स्वकर्तृत्ववान नेतृत्त्वाला मदत करून घडवून आणावे लागेल...**

ज्या प्रकारच्या संकल्पनेत आयुष्यात आज परभणीकर वावरत आहेत **त्यात समीरभाऊ योग्य आहेत तर कसे??**

**हे समजावून घ्या ह्या पुस्तिकेतून !!** सर्व नेतृत्त्वगुणांनी संपन्न असलेल्या समीरभाऊबद्दल ही पुस्तिका बरंच काही सांगून जाते. **वाचा आणि ठरवा** समीरला मदत करण्याबद्दल..!!!!

## : समीरची शक्ती असणारे :



बाल विद्या मंदिर शाळेच्या काळापासून समीरला जवळून ओळखणारा मित्रवर्ग..



समीरसोबत काम करणारी आणि त्याला मदत करणारी उद्योजक मित्रमंडळी

# परभणी जिल्हा व परिसरातील नागरिकांना माझा सप्रेम नमस्कार !



"निष्कलंक, **प्रामाणिक काम करूनही मुख्यमंत्रिपदाचा दावेदार होता येते,** हे राजकारण्यांना दाखवून देणारा **दुधगांवकर परिवार ज्या मातीने महाराष्ट्राला दिला त्या परभणी जिल्ह्याचा मी आहे**" असे जिल्ह्यातील कोणालाही गर्वाने ज्या परिवारामुळे सांगता येईल अशा परिवारातील मी !! चांगलं प्रामाणिक समाजहिताचे काम करत राहण्याची ही **परंपरा पुढे चालवण्यासाठी ईश्वराने मला लायक समजलं हे मी माझं भाग्य समजतो.** याच भावना घेवून गेल्या काही वर्षांपासून परभणी लोकसभेतील लोकांच्या विकासासाठी, त्यांच्या समृद्धीसाठी मनापासून प्रयत्न करतोय.

**भगवतगीतेची शिकवण आणि "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" या उक्तीवरील दृढ विश्वास, यामुळे** आपल्या लोकांसाठी काम करत आहे. **उद्योग जगतातील माझा अनुभव, संबंध आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या राज्यव्यापी (व्यापार) शिखर संस्थेची मदत,** या सर्व गोष्टींचा उपयोग परभणी लोकसभेतील व राज्यातील लोकांच्या विकासासाठी करायचा प्रयत्न चालू आहे.

त्यातूनच अनेक जणांना उद्योग उभारणीसाठी, शेती व पूरक व्यवसायासाठी, शैक्षणिक कामासाठी मदतही झाली आहे. आणि **खरं पाहिलं तर ये तो बस एक शुरुवात है...!!!!**

गेल्या कित्येक वर्षांपासून परभणी जिल्ह्याच्या विकासाचा जो अनुशेष आहे तो भरून काढण्यासाठीची यंत्रणा आम्ही उभी करत आहोत. परभणी शहरच नाही, तर **खेड्यापाड्यांत स्वतः जाऊन** लोकांना उद्योग करण्यासाठी, आधुनिक पद्धतीने शेती करून फक्त उत्पादनच नाही तर उत्पन्न वाढवणे, मिळवलेल्या उत्पन्नाचे योग्य नियोजन करण्याचे प्रबोधन करणे **असे मूलभूत काम आम्ही करत आहोत.** कमवायचं कसं आणि कमावलेलं खर्च करायचं कसं, हे जर लोकांना नीट समजलं तर लोकांना कुणाच्या आश्रयाची किंवा कुणाच्या मदतीची गरज कधी पडणार नाही.

यासोबतच **दुधगांवकर परिवाराच्या सर्व जवळच्या नव्या-जुन्या सहकाऱ्यांना, आप्तेष्टांना तसेच युवकांना** एक महत्त्वाचे आवाहन मला इथे करायचं आहे.

सर्वप्रथम गेली अनेक वर्षे दुधगांवकरांना तुम्ही सर्वांनी केलेल्या सर्वतोपरी **सहकार्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार,** त्या काळच्या मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीपर्यंत आपण पोचलो होतो. जशी साथ आपण गणेशराव दुधगांवकर यांना दिली. **तशीच मलाही द्याल हा दृढ विश्वास आहे.**

चांगलं काम करायचं आहे, जे की खूप मोठे आव्हान आहे आणि हे सर्वांचे काम असल्यामुळे सर्वांची प्रामाणिक कामात साथ मिळणे, सहकार्य मिळणे गरजेचे आहे **तेव्हा माझ्या परभणी लोकसभेतील सर्व नागरिकांना, हितचिंतकांना, युवकांना तसेच आप्तेष्टांना** विनंती की आपण आपले नाव, गाव व मोबाईल नंबर लिहून **माझ्या व्हाट्सॲप ९८ २०२ ३० ४०२ नंबरवर पाठवा.** आपल्याला मी स्वतः डायरेक्ट मॅसेज पाठवून पुढच्या वाटचालींबद्दल, वेगवेगळ्या संधींबद्दल माहिती देत जाईल....!!

जर तुम्हाला वाटत असेल की आपण राहत असलेल्या गावांचा कायापालट करण्यास मी आपली मदत करू शकतो तर, 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे आपण एकसाथ काम करूया आणि **क्रांती घडवून आणूया... !**

आपलाच,

**समीर गणेशराव दुधगांवकर**

M.S. USA.

उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (२०१४ ते २०१८) - {राज्य शिखर संस्था (व्यापार). पाच लाख पेक्षा जास्ती उद्योजकांसोबत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार संस्थेंसोबत जोडू शकणारी संस्था.}

**ईश्वरकेंद्रीत व्यक्ती, २००२ सालापासून भगवतगीतेचा अभ्यासक..**

टीप: खाली दिलेल्या व्यक्ती व क्रमांकांद्वारे माझ्याशी संपर्क करू शकता किंवा त्या क्रमांकांवर आपले नाव, गाव मेसेज करू शकता..

संदीप राऊत दुधगांवकर : **9422 93** 64 58, प्रभाकर घाटगे : **9422 93** 54 07

बापूसाहेब कदम : **9422 93** 64 60



मूळचे परभणीचे आणि मागील ४२ वर्षांपासून अमेरिकेत स्थायिक असलेले व्हेटर्नरी डॉक्टर श्री. अविनाश देशमुखजी आणि समीर दुधगांवकर यांची काही दिवसांपूर्वी परभणीमध्ये भेट झाली. भेटल्यानंतर त्यांची प्रतिक्रिया त्यांनी फेसबुकवर पोस्ट केली होती. चला पाहू काय म्हणत आहेत डॉ. अविनाशजी समीरबद्दल :

## " A new voice and smart voice in Parbhani : Mr. Samir Dudhgaonkar

In my recent visit to Parbhani (Jan.2019), my friend Dr. Anand Deshpande took me to visit Mr. Samir Dudhgaonkar in Dnyanopasak college. Though I had known Samir through FB, it was my first time to meet him in person.

**And boy, am i impressed with his work!!!** This tall and handsome man is filled with enthusiasm and is determined to make positive changes. You can not help but be awed with his endless energy.

**To begin with he has a towering personality oozing positive attitude.** He told me the work he has been doing in the colleges in transforming young minds for becoming entrepreneurs and/or influential individuals. Upon completing advance degree in Detroit he returned to Parbhani and **has been providing the needed skills to the young minds.**

I would have loved to talk with him for a bit longer and get to know his work, but I had to leave.



डॉ.अविनाशजी देशमुख (अमेरिका) यांच्यासमवेत समीरभाऊ दुधगांवकर

I wish we could clone more people like him. **That would put India in another orbit..!!!!..."**



विवेक भोसले

**शा**सकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या व्यवस्थापकीय मंडळाचे अध्यक्ष, एका आंतरराष्ट्रीय काम असलेल्या व्यवसायाचे व्यवस्थापकीय संचालक (MD) म्हणून निवृत्त झालेले, **ज्यांनी सिंगापूर, मलेशिया, अमेरिका, इंग्लंड यासारख्या देशात काम केले आहे.**

तसेच मराठा तरुणांसमोर एक आदर्श म्हणून ज्यांचे नाव आदराने घेतले जाते. **अशा श्री. विवेक भोसले यांचे समीरबद्दलचे मत :**

## “समीर ... एक संयमशील, धडाडीचा, प्रतिभासंपन्न व उमदा तरुण.

समीरला अत्यंत जवळून ओळखणे व **त्याच्या बरोबर काम करण्याचा योग येणे हा एक सुखद अनुभव आहे.**

**मा. खासदार श्री. गणेशरावजी दुधगांवकरांचा** तो मुलगा आहे ह्याची कल्पना खुप उशिरा आली, **त्यामुळे मला पूर्वग्रह विरहीतपणे त्याचे मूल्यांकन करता आले.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एका प्रकल्पाला एक प्रमुख वक्ता म्हणून तो हजर राहणार म्हणून कळाले; पण सकाळी प्राचार्यांनी कळवले की, समीरचे पहाटेचे विमान चुकल्यामुळे तो येऊ शकत नाही.

मी बाहेरगावी असल्यामुळे स्वत: त्या कार्यक्रमाला हजर राहू शकत नव्हतो, म्हणून दुपारी समारंभाबद्दल प्राचार्यांना विचारणी केल्यावर सुखद आश्‍चर्य वाटले की समीरने आमचे मित्र **उद्योजक राम भोगलेंना** आगळ घालून ऐनवेळी कार्यक्रमाचे उद्घाटन करावयाला लावले. एवढेच नाही तर **मुंबई विमानतळावरून तडक कारने ५ तासांत औरंगाबाद गाठून** त्याने त्याच्या ठरविलेल्या विषयावर प्राध्यापकांबरोबर आणि विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. साहजिकच आहे की समीरबद्दल **एक वचनबद्ध तरुण** म्हणून प्रतिमा माझ्या मनात तयार झाली.

**अमेरिकेची भूलभुलैया सोडून, उच्चशिक्षण घेऊन मायदेशी परत येणे व आपल्या समाजाशी, राज्य व जिल्ह्यातील लोकांबरोबर नाळ जोडणे, तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणे, अध्यात्मिकतेची जोड देणे व तरुणांची बेरोजगारी दूर करण्यासाठी काहीतरी भरीव कामगिरी करण्याचा प्रयत्न करणे** ह्यामागची समीरची तळमळ, भावना व कटिबद्धता वाखाणण्यायोग्य आहे.

तरुण वयात **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या उपाध्यक्षपदी** पोहोचणे, त्या माध्यमातुन विद्यार्थ्यांमध्ये **उद्योजकता विकास** करणे व **रोजगारक्षमता वाढीसाठी** एक परीपुर्ण योजना कार्यान्वित करणे हे एक अति महत्त्वाचे काम **समीरने हाती घेतले आहे** व त्याचा लाभ आमच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही मिळत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मनामध्ये व्यवसायाबद्दल एक पर्याय म्हणून जागरुकता निर्माण करणे व युवकांना स्वत:च्या पायावर उभे राहुन व्यावसायिक बनवणे ह्या **एका व्यापक अभियानाचा संपूर्ण मराठवाड्यात प्रसार करणे ह्यावर आम्ही दोघांनीही काम करण्याचा शुभारंभ केला आहे..**”

**श्री. विवेक भोसले**

## “समीर दुधगांवकर...
## एक प्रसन्न व्यक्तिमत्व,
## विचारांमध्ये स्पष्टता,
## आणि चांगली स्वप्न पाहणारी व्यक्ती...

**का**ही महिन्यांपूर्वीच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या व्यासपीठावर आमची भेट झाली. **पहिल्या भेटीतच** मला त्याच्यामध्ये प्रामाणिकपणा, विशिष्ट ध्येय गाठण्यासाठी काम करण्याची प्रामाणिक इच्छा असणारा आणि एखादे हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठीची लागणारी समर्पित भावना या गुणांची जाणीव झाली.

**स्पष्ट बोलण्यामुळे** तुम्ही त्याच्याकडे आकर्षित होता. त्याचा साधेपणा खूप खास आहे. त्याच्या वागण्यामध्ये कुठल्याही प्रकारचा **उर्मटपणा** दिसून येत नाही. समीरला त्याच्या **वारसा परंपरेचा अभिमान** आहे, परंतु दिखाऊपणा करून काम होण्यासाठी तो त्याचा अयोग्य वापर करीत नाही.

कमी वयातच त्याने एक महान दूरदृष्टी बाळगली आहे. त्याच्यामध्ये **नेतृत्त्व कौशल्य** दिसून येते. तसेच माणसे जोडण्याची समीरची कला यामुळे तो इतरांपेक्षा वेगळा ठरतो. येणाऱ्या काळामध्ये लोक ज्या नेतृत्वाच्या शोधामध्ये असतील ते **नेतृत्त्व म्हणजे समीर !**

खरच एक उज्ज्वल भविष्य त्याच्या स्वागतासाठी तयार असल्याचे वाटते. **युवकांपैकी एक,** त्याच्या इतकेच आश्‍वासक नेतृत्त्व असणारे दुसरे कोणतेही नेतृत्त्व दिसत नाही.

**मला विश्‍वास आहे की, समीर खूप प्रगती करेल आणि जनतेचा प्रचंड पाठिंबा त्याला मिळत राहील. नजिकच्या काळात त्याच्याकडून अनेक अभूतपूर्व गोष्टी घडतील.....**”



**श्री. उमेश दाशरथी**

**एम.डी. रुचा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज**

श्री. उमेश दाशरथी हे रुचा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक (MD) आहेत. त्यांनी चार राज्यांमध्ये १० ठिकाणी कारखाने उभे केले आहेत. १५०० पेक्षा जास्त लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. **या कंपनीची वार्षिक उलाढाल, जवळपास १००० कोटी रुपये आहे.** रुचा ग्रुप हा ऑटो पार्टस, रोबोटिक्स इत्यादींची निर्मिती करतो.

**चेअरमन :** मराठवाडा ऑटो क्लस्टर. भारत सरकारच्या योजनेतून राज्यामध्ये ९० कोटी रुपये खर्च करून अद्ययावत क्लस्टरची उभारणी.

**उपाध्यक्ष :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर. स्थापना १९२७
माजी अध्यक्ष: चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज आणि ॲग्रीकल्चर. अनेक राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त. भारताचे पंतप्रधान व अर्थमंत्री यांच्या हस्ते सन्मानित
**“ग्लोबल महाराष्ट्रीयन ऑफ द ईअर २०१७”** या पुरस्काराने सन्मानित
**“लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द ईअर २०१६”** साठी नामांकित
सध्या अनेक सामाजिक संघटनांमध्ये कार्यरत

**चांगला स्वभाव असणारे परंतू फक्त स्वत:पुरते जगणारे जगात खुप आहेत. वरील समीरबद्दलच्या प्रतिक्रिया वाचून असे जाणवते की, तो स्वभावाने चांगला तर आहेच, नेतृत्त्व गुण असलेलाही आहे, पण महत्त्वाचे म्हणजे समाजाप्रती बांधिलकी जपणारा आहे. भारतीय संस्कृतीवर विश्‍वास असल्यामुळे अमेरिकेचा नाद सोडून परत आलाय..**

**असा समीर वैज्ञानिकदृष्ट्या कसा आहे, त्याच्या टीमचे काम काय आहे, कोणत्या अनुभवातून तो घडलाय, त्याच्या यशाचे रहस्य काय, पुढे काय करणार... आदींबाबत समजून घेऊयात..**

आज काल खूप कंपन्या वैज्ञानिक परीक्षा घेऊन एखाद्याचा स्वभाव आणि क्षमता जाणून घेतात. समीरने दोन चांगल्या कंपन्यांच्या परीक्षा घेतल्या. हे वैज्ञानिक अहवाल समीरबद्दल काय म्हणतात...?



# समीर दुधगांवकर यांचा वैज्ञानिक व्यक्तिमत्व विश्लेषण अहवाल

समीर हे उत्कृष्ट मानवी व्यवस्थापन कौशल्य असणारे **आत्मविश्वासू, प्रगल्भ आणि नैसर्गिकतः नेतृत्त्वगुणसंपन्न** व्यक्तिमत्व आहे. उद्दिष्ट प्राप्तीसाठी योग्य मार्ग ठरवणारे, निर्णय घेण्याची क्षमता असलेले आणि कामाचे विकेंद्रीकरण करणारे हे व्यक्तिमत्व आहे. **समीर यांना लोकात मिसळायला आवडते.**

समीर हे कोणत्याही परिस्थितीची हाताळणी करण्यास **योग्य व सक्षम नेतृत्त्व** म्हणून एक प्रभावी व्यक्तिमत्व आहे. ते नैसर्गिक पद्धतीने बदलत्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवून अंतिम ध्येयाकडे वाटचाल करतात. कोणत्याही परिस्थितीत आपल्या **सहकार्यांसह काम करणे, त्यांना सतत प्रोत्साहीत करणे व त्यांच्यासह पुढे जाणे यात त्यांचा हातखंडा आहे.**

समोरच्याशी बोलतांना त्यांचे **बोलणे व्यवस्थित ऐकून घेण्याच्या समीर यांच्या** स्वभावामुळे त्यांना त्यांच्या संघातील व्यक्तीचे गुण लक्षात येतात. सहकाऱ्यांची मते जाणून घेण्याबद्दल त्यांचा **सकारात्मक दृष्टिकोन** असतो. त्यांच्यामध्ये सहकाऱ्यांशी **सरळसरळ संभाषण** करण्याचे धाडसही आहे.

आव्हानांना स्वीकारण्याची व त्यांना जिंकण्याची आवड असलेले हे व्यक्तिमत्व आहे. प्रामाणिकपणे स्पर्धा करून योग्य ध्येयांना जिंकणे त्यांना आवडते. **समीर हे सांघिक ध्येयाशी कटिबध्द असतात. समीर हे इतरांबद्दल सहिष्णू भूमिका ठेवतात. त्यांची मते जाणून घेतात व स्वतःचे विश्लेषण परखडपणे मांडतात.** आपले सहकारी आनंदी राहतील व त्यांच्या गरजा पूर्ण होतील यासाठी समीर प्रयत्नशील असतात.

समीर हे **विश्वास ठेवण्यास पात्र**, स्वीकारण्यायोग्य आणि प्रबळ व्यक्तिमत्व आहे. त्यांची प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता उच्च असून ते कृतिशील आहेत. त्यांना केलेल्या कामाची इतरांनी नोंद घेतलेली आवडते. ते तणाव प्रभावीपणे हाताळतात व विविध परिस्थितीत समरस होऊन राहतात.

समीर अभ्यास करून घेतलेला निर्णय **अमलात आणतानादेखील** आपल्या सहकाऱ्यांच्या भूमिका आणि त्यांच्याकडील वेगवेगळी कौशल्ये यांना एका सूत्रात गुंफण्याची क्षमता बाळगतात. **त्यांच्याकडे अभ्यासपूर्वक तयार झालेल्या मतांना इतरांसमोर मांडण्याचे आणि इतरांना पटवून देण्याचे कौशल्य आहे. आपल्या आसपासच्या लोकांना सशक्त करण्याचा दृष्टिकोन समीर बाळगतात.**

सांघिक कामामध्ये ध्येय प्राप्तीसाठी समीर उत्कृष्ट मार्गदर्शन करतात. तसेच संघातील सहकाऱ्यांना आपआपल्या कामात लक्ष देण्यास मदत करणारे त्यांचे नेतृत्त्व आहे. ध्येय प्राप्तीसाठी सहकाऱ्यांची क्षमता व पात्रता यांचा विनियोग उत्कृष्टपणे करण्यात समीर सक्षम आहेत.

**थोडक्यात- समीर दुधगांवकर हे एक उत्साही, नैसर्गिकतः नेतृत्त्व गुण लाभलेले, प्रगल्भ, कार्यक्षम, अभ्यासू आणि "लोकांमधील एक" असे व्यक्तिमत्व आहे.**

## एका जागतिक दर्जाच्या कंपनीच्या व्यक्तिमत्व विश्लेषण अहवालातील समीरबद्दलचा महत्त्वाचा भाग

- Samir tends to be in a career if it involves a structured working environment, over which he can exert some control
- Samir likes organising and directoring resources to achieve clear objectives, using well-defined processes - e.g. managing projects (of whatever size) to achieve a well-defined plan
- Samir prefers careers that involve:
  - Interacting with people and things
  - Dealing with facts and tangible outcomes
  - Making decisions using objective logic
  - Using a well-defined and structured workstyle

### SAMIR'S WORK-RELATED STRENGTHS :-

- Practicality & focus on results
- Common sense & realistic perspective
- Forcefulness in dealing with your commitments; can be tough when necessary
- Ability to stay focused on the organization's goals
- Precision and accuracy and desire to get the job done right
- Desire to follow established routines and procedures
- Ability to recognize what is illogical, inconsistent, impractical, or inefficient
- Organizational skills; good at making objective decisions
- Belief in the value of a traditional structure and the ability to work within it
- Sense of responsibility; can be counted on to do what he says
- Good work ethic; expects everyone to be efficient and productive

### Samir Generally has following Qualities :-

- A Natural leader
- Has a clear set of standards and beliefs which to live by
- Values security & tradition
- Loyal
- Hard-working & dependable
- Enjoy creating order & structure
- Will follow projects through to completion & is Very thorough
- Straight-forward & honest
- Athletic & wholesome
- No patience with incompetence or inefficiency
- Excellent organizational abilities
- Driven to fulfill duties

# उद्योजक घडविणारा अभियंता... समीर दुधगांवकर



आजच्या विद्यार्थ्यांची मानसिकता ही फक्त रोजगारापुरतीच मर्यादित झाली आहे. मात्र युवकांतील हीच मानसिकता सकारात्मकतेत बदलून त्यातून **स्वयंरोजगार आणि उद्योजक निर्माण करण्याचा ध्यास** समीर दुधगांवकर यांनी घेतला आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून समीर यांनी परभणी जिल्ह्यासह राज्यातील **१५ हजार तरुणांना उद्योग, व्यवसायाचे धडे** देत प्रशिक्षित केले आहे. **त्यापैकी काहींनी** टॉपच्या कंपन्यात मोठ्या हुद्द्यावर नोकऱ्या, तर काहींनी स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू करून इतरांनाही रोजगार दिला आहे.

जीवनाला उभारणी देतानाच **समाजहित, देशहित यासह माणुसकी जपत समीर दुधगांवकरांनी स्वतःचं वेगळं अस्तित्व निर्माण केलं आहे.**

राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात समीर दुधगांवकर यांचा जन्म झाला. **लहानपणापासूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा समीरवर प्रभाव होता.** छत्रपतींमुळे जसे करोडो लोकांचे आयुष्य बदलले, त्यांचाच आदर्श घेत आपल्या हातूनही काही तरी चांगले घडावे या हेतूने त्यांनी कायम वेगळी वाट धुंडाळली. वडील माजी खा. ॲड. गणेशराव दुधगांवकर.. **मुरब्बी राजकारणी. ९० च्या दशकात ते मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत अग्रगण्य होते.** एवढ्या मोठ्या राजकारण्याचा मुलगा समीर हादेखील आधीच राजकारणात येईल. अशी प्रत्येकाची अटकळ होती.

समीरने परभणीच्या बाल विद्या मंदिरमध्ये शालेय शिक्षण घेतल्यानंतर औरंगाबाद



शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली. **त्यानंतर अमेरिकेच्या विद्यापीठातून एम.एस. ही पदव्युत्तर पदवी मिळविली.** उच्च विद्या संपादित केल्यानंतर परदेशात कुठेही मोठ्या पगाराची नोकरी करता आली असती, परंतु **भारत भूमीसाठी काहीतरी करण्याची ओढ** आणि **'जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी'** या उक्तीवरील दृढ विश्वास समीर दुधगांवकर यांना मायदेशी परत घेऊन आला.

समाजाच्या प्रत्येक घटकाच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून आहे. त्यामुळे प्रत्येक घटक भक्कम करण्याचा विडा समीर दुधगांवकर यांनी उचलला आहे आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या माध्यमातून या कामाला गती दिली जात आहे. २०१४ - १८ अशी सलग चार वर्षे त्यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या ह्या राज्य शिखर संस्थेचे मानाचे उपाध्यक्षपद भूषविले आहे. आयएलएफएस स्कील्स या कंपनीला प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत उत्कृष्ट काम करणारी असा पुरस्कार मिळाला आहे. आयएलएफएस एज्युकेशन (आयईटीएस) कंपनीला देशातील सर्वात वेगाने वाढणारी कंपनी हा पुरस्कार मिळाला आहे. या कंपनीच्या सल्लागारपदी समीर दुधगांवकर यांची काही काळाआधीच नियुक्ती झाली आहे.



आपल्या शिक्षण आणि अनुभवाचा फायदा सर्वसामान्य कुटुंबातील बेरोजगार तरुणांना व्हावा, त्यांना रोजगार मिळावा, नवे उद्योजक निर्माण व्हावेत, **या हेतूने प्रेरित होऊन** समीर दुधगांवकर हे केंव्हाच झपाटून कामाला लागले आहेत. त्यांची तरुणांची एक टीम कार्यरत आहे. या टीमने आतापर्यंत परभणी जिल्ह्यासह नांदेड, लातूर, हिंगोली, औरंगाबाद, नाशिक, मुंबई येथील तब्बल **१४ हजार ४९०** तरुणांना कौशल्य प्रशिक्षण दिले आहे. उद्योग



**उभारणी संदर्भात लागणारी सर्व माहिती**, शासकीय योजना, कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था, बँका, बाजारपेठ आदींची माहिती दिली जात असल्याचे समीर दुधगांवकर टीमने सांगितले. यातून अनेकांनी नवे उद्योग सुरू केले आहेत. **शहरी व ग्रामीण भागात प्रत्येक ठिकाणी** महाराष्ट्र चेंबरचे नेटवर्क तयार करून बेरोजगार युवकांना रोजगार मिळवून देण्याचा संकल्प समीर दुधगांवकर यांनी बोलून दाखविला.

**विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडणे हा मोठा प्रश्न** भारताला भेडसावतोय. **अशाच** फक्त दहावी-बारावी शिकलेल्या **लोकांना** पुण्यात नोकरी लावणे समीरच्या टीमच्या मदतीने सहज शक्य आहे. **कॉमर्स शाखेच्या** बेरोजगार तरुणांना विविध कंपन्यात नोकऱ्या मिळवून देण्याची जबाबदारी समीरच्या उद्योजकांच्या संबंधांमुळे **दरवर्षी होत राहील, असे नियोजिले आहे.**



**लोकांचे आयुष्य चांगले करण्यासाठी जे करता येईल ते सगळे करण्याचा ध्यास घेतलेल्या समीर दुधगांवकरांच्या कार्यास सलाम..!**

▸ पान क्र. १० पहा...





जगन्नाथपुरी धर्मपीठ जगद्गुरू शंकराचार्य, राष्ट्रसंत धर्मगुरू डॉ. श्री श्री रामरावजी (बापू) महाराजांचे व ज्येष्ठांचे आशीर्वाद घेताना





वनामकृ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अशोक ढवण यांच्यासमवेत...











विविध विकास कामांचा शुभारंभ करताना...

राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्याबद्दलचे काही क्षण...













शेतकऱ्यांसाठी ब्राझील व स्पेन दुतावासातील पदाधिकाऱ्यांसोबत..








समाजातील सर्वच घटकांसोबत हसत खेळत काम करताना...






▸ पान क्र. ०७ वरून पुढे...

## हजारो शेतकऱ्यांशी साधला थेट संवाद..!

सध्या शेती व्यवसाय फार अडचणीतून जात आहे. उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित विस्कटून शेतकरी आत्महत्येचा मार्ग निवडत आहेत. हे चित्र बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता, शेतीपूरक व्यवसायावरपण भर द्यावा, असे मत समीर दुधगांवकर यांनी व्यक्त केले. आतापर्यंत आपण खेड्यापाड्यात जाऊन जवळपास **तीन हजार १०० कुटुंबांतील १४ हजारपेक्षा जास्त लोकांशी थेट संपर्क साधला आहे.** शेतीपूरक व्यवसायाचे मार्गदर्शन केले जात आहे. ज्ञानोपासक महाविद्यालयात कृषिक्षेत्रातील तज्ज्ञ, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करून शेतकरी, युवकांना मार्गदर्शन केले आहे. रुढी येथील शेतकऱ्यास दाल मिल प्रकल्प मंजुरी, मानोली येथील **२८ युवा शेतकऱ्यांना रेशीम उद्योगासाठी सरकारी मदत या उदाहरणासह अनेकांना उद्योग उपलब्ध करून दिला असल्याचे** समीर दुधगांवकर यांनी सांगितले. त्यासोबतच आपल्या भागातील शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाची जाण असावी, त्यांचे उत्पन्न वाढावे या हेतूने दरवर्षी कृषी प्रदर्शनी आयोजित केली जावी, यासाठी प्रयत्न केले. त्यातूनच **औरंगाबाद येथे दरवर्षी महाॲग्रो या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे.**

## परभणी जिल्हा उद्योग व्यवसायात मागे का ?

दळणवळणाच्या सुविधा, उद्योग धंद्यासाठी पूरक वातावरण, पाणी, वीज, जमीन आदी सर्व सुविधा असतानाही परभणी जिल्ह्याचा विकास का होत नाही ? **असा प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो.**

याबाबत बोलताना समीर दुधगांवकर म्हणतात की, युवकांची मानसिकता सकारात्मक होणं गरजेचं आहे. स्वतःच्या मेहनतीतून पैसा उभा करणे **हे जास्ती सन्मानाचे जेंव्हा लोकांना वाटेल तेंव्हा व्यक्ती उद्योजक होतो.** सबसीडी



खाऊन टाकणे, बँक लोन परत न करणे इत्यादी चुकीच्या मार्गाने आलेल्या पैशातून जर कोणी उदरनिर्वाह करत असेल तर ती व्यक्ती उद्योजक होत नाही. लोकं मनाने चांगलीच असतात, पण **कधी कधी आसपासची व्यक्ती किंवा नेते मंडळी दिशाभूल करू शकते.** त्यातून जर लोकांनी स्वतःला सावरले तर नक्कीच अनुभवातून स्वतःच्या पायावर उभे राहणे शक्य होऊ शकते. नेमके हेच होत नसल्यामुळे किंवा कोणी या बाबीवर काम करत नसल्यामुळे लोकांची मानसिकताच बनत **नसल्याने आपण उद्योगधंद्यांत पिछाडीवर असल्याचे चित्र समोर येत आहे.**

प्रशिक्षित कामगार ही पण मोठी समस्या आहे. परभणीतच नाही तर मोठ्या शहरात सुद्धा हाच प्रश्न आहे. त्यासाठी आम्ही ज्ञानोपासक महाविद्यालयात २०१३ पासून सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहोत. सध्या सर्वस्तरातील उद्योगांना, दुकानांच्या सेवेसाठी जीएसटी जागरुकता कार्यक्रम घेतला आहे. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा व टीमने **परभणीतील २०० हून अधिक उद्योजकांना** मार्गदर्शन केले आहे. तसेच पर्यावरणाला हानी न पोहचविता उत्पादने बनविण्यासाठी व ती त्रुटीरहित रहावीत यासाठी **झिरो इफेक्ट झिरो डिफेक्ट** हा कार्यक्रम घेण्यात आला. जिल्ह्यातील ७८ उद्योजकांना **क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन** करण्यात आल्याचे समीर दुधगांवकर यांनी सांगितले.



उद्योजक संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून काम करताना समीर मुळे, चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा यांच्यामुळे मराठवाड्यासाठी महाॲग्रो प्रदर्शन दरवर्षी भरेल यासाठी प्रयत्न यशस्वी झाले. त्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाचा हा फोटो...



देशाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत मत मांडताना समीरभाऊ...




चार भाऊ.... त्र्यंबकभाऊ, रामभाऊ, सतीशभाऊ आणि समीरभाऊ... उद्योग आणि शिक्षण क्षेत्र एकत्र आणताना..



गावकऱ्यांचे प्रबोधन करताना समीरभाऊ दुधगांवकर....

# समीरला घडवणारे काही अनुभव ...




समीरशी चर्चा करताना तसेच त्यांच्या फेसबुक पोस्ट्सवरून काही रोचक अनुभव ते कथन करतात. त्यांच्याच लिखानातून समजून घेऊया ह्या अनुभवातून काय शिकण्यासारखे आहे ते....

समीरचे काम वाखाणण्याजोगे आहेच, पण असे म्हणतात, **Internal growth comes before external growth...** तसे समीरला घडवणारे अनुभव महत्त्वाचे आहेत. ज्यातून समीरने काही शिकले आणि मागील काही पानांवर दिल्यासारखे स्वतःच्या मेहनतीवर वेगळी वाट घेऊन युथ ऑयकॉन, युवकांच्या गळ्यातील ताईत बनलेत...

## बुलेटची खरी कहानी.. १९९५..

(संभाषणाच्या स्वरूपात देतोय..पूर्ण वाचा आणि बोध घ्या..)

लहानपणी चांगले वागलेला, लहानपणापासून निर्व्यसनी, खिलाडू वृत्तीचा, चांगला अभ्यास करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मेरिटवर प्रवेश मिळवलेला समीर!! अभ्यासासाठी, पदवी शिक्षणासाठी संभाजीनगरला पोहोचला...

**काही दिवसांत, कोणत्याही युवकाने पालकांना म्हणावे तसेच समीर आईला म्हणाला -"आई, मोटरसायकल घेऊन दे"..**

आई "फर्स्ट क्लास घे पहिल्या वर्षी, मग देईल."

इंजिनियरिंगमध्ये सहसा पहिल्या वर्षी पास होणं पण मुश्किल जाते मराठी माध्यमाच्या मुलांना, फर्स्ट क्लास तर सोडाच!!...

**हे थोडी माहिती होतं पण मला!! ... पुढे वाचा..**



प्रताप कदम, माझा मामा , "समीर, बुलेट घे... भारदस्त वाटते चालवताना"..

ते ऐकून बुलेट घ्यायचे ठरवले..

समीर : (रिझल्ट नंतर १९९५ ऑगस्ट मध्ये,) "आई, फर्स्ट क्लास आलो, बाईक दे अटीत ठरल्यासारखी.."

आई : "थांब, पैसे नाहीत, थोड्या दिवसात देते"..

समीर : "अट पूर्ण केलीये, बाईक पाहिजे. आधी नियोजन का नाही करून ठेवले??."

( मग थोडी वाट पाहून, समीर डोकं खायला लागला,) **"अट पूर्ण!! कुठल्याही हालतीत बाईक पाहिजे!!"**

प्रताप मामा : (ही वादावादी बघून समीरला ) ," समीर आईकडून शक्य नाहीये.. सतत ताणाताण असते पैश्याची तिच्याकडे.. मागे का लागलास??"

समीर : (मामाला,)" मला अट कशाला टाकली?? मला बाईक पाहिजेच!!.."

(नक्की आठवत नाहीये कोण बोलले ते !! ), **(कुणीतरी समीरला..)** "समीर असा त्रास नको देऊ आईला.. तुझी आई धडपड करतेय म्हणून तुम्हाला काही तरी करता येतंय , तुझे बाबा काहीच करत नाहीत परिवारासाठी!!"...

समीर : "ते मला माहिती नाही.. बोलली कशाला?? बाईक पाहिजे..."

बाबांना, गणेशराव दुधगांवकरला बोललो, “अट पूर्ण केलीये, बाईक घेऊन द्या..” पण बाबांनी ओळख नसल्यासारखे केले.. 😜 😜

परिवार म्हणून (शेवटची ट्रिप) अहमदाबाद, उदयपूर, राजस्थानला गेलो, मधुरा, मी, आई, बाबा.. **दिवाळी १९९५..**

ट्रिप संपवून परत येतांना बाबा ट्रेनमध्ये ट्रिपचा खर्च हिशोब काढत होते.. ४८,००० झाला बोलले.. आगीत तेल ओतल्यासारखे बाबा बोलले की, **“अरे समीर एवढ्यात तुझी बाईक आली असती...”**.

**माझी सटकली.** ट्रिप नसती केली की आपण!! ट्रिप संपल्यावर काय सांगता??😡

लढाई चालू ठेवली, हक्कासाठी लढलो म्हणून आईने डोके चालवले, डीसीसी बँकेचे लोन काढायची शक्कल काढली... **अन्यथा माझ्या इच्छेचा एन्काउन्टर करायचे प्लॅन केले होते आई, मामांनी मिळून!!**

दशरथ जाधव दाजी ह्यांना विनंती केली की फाइल करा.

डीसीसी बँक सगळ्यात छान १९७० पासून १९८७ पर्यंत लिंबाजीराव दुधगांवकर यांनी नफ्यात चालवली होती.. नंतर आजतागात कोणीही चालवली नाही.. **१९९५ च्या ह्या किस्स्यापर्यंत बँकेची त्याकाळच्या राज्यकर्त्यांनी वाट लावली, म्हणून प्रशासक आले होते बँकेवर!!**

मग समीर दशरथ जाधव दाजींसोबत प्रशासकांना भेटला, आईनेपण प्रशासकांना विनंती केली की, **आम्ही चांगला परिवार आहोत, लुटणार नाही, डूबवणार नाही..** प्रशासकाने परिवाराच्या प्रामाणिकपणाची पार्श्वभूमी माहिती असल्यामुळे योग्य निर्णय घेतला, बँक कर्मचारी असलेल्या दाजींची फाइल रुटीन प्रक्रियेत मंजूर झाली...

**औरंगाबादला मला सांगण्यात आले** मानसिंग पवारांच्या रत्नप्रभा मोटर्समध्ये जा त्यांना भेट, बाईक घेऊया त्यांच्या डीलरशिपमधून... आणि त्या ग्रेट माणसाची **- मानसिंग पवारांची पहिली भेट झाली.. !!!!**

बुलेट डीलरशिपचा मालक, पारिवारिक मित्र जरी असला तरी नीट बोलेल की नाही मानसिंगकाका हा विचार केला.. पण बाईकसाठी हिम्मत केली आणि भेटलो... 😊

किती छान बोलले काका.!!!.. अजून भेटीचा एक-एक क्षण आठवतो...

**धन्यवाद मानसिंगजी तेव्हापासून चांगले वागवल्याबद्दल!! आजपर्यंत...!!**

२१ डिसेंबर १९९५ ला बाईक डिलिव्हरी देण्यात आली..

**नितीन दादा दुधगांवकरांना** चांगल्या नंबरसाठी मदत करा बोललो!! दादा मित्र असलेल्या आरटीओकडे घेऊन गेले.. मी ९ नंबर द्या बोललो... सिरिज शक्य नव्हती, आरटीओ बोलले, ``... **MH 22 B 2000** घे... चांगला दिसेल..``

ऐकले मी !! आणि तिच ही बाईक... आज २२/२३ वर्षांनंतर..

### आजकालच्या युवकांसाठी संदेश-

***संदेश क्रमांक १***

***मुलांसाठी दर काही महिन्यांत अभ्यासातील ध्येय ठरवून, ते ध्येय साध्य केल्यानंतर छोटेसे बक्षीस द्यावे. जेणेकरून मुलांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होईल. तसेच आज मागे वळून पाहता, अशा काही पारिवारिक अनुभवातून देव मला काहीतरी शिकवत होता... पण माझे युवक म्हणून दुर्लक्ष होते आयुष्याच्या धड्यांसाठी!!***

*छोट्या छोट्या गोष्टीतून कळून येते शब्द कोण पाळतो, परिवाराच्या गरजाकडे जबाबदारीने कोण लक्ष देतो.. **लक्ष असेल** तर संवेदनशील व्यक्तींना अनुभवातून देव दाखवून देतो की कोण कसा आहे ते.. लक्ष न दिल्यास, चुकीचे लोक आसपास असल्यास, तुम्हाला हवे ते योग्य वेळी मिळत नाही..*

*त्या वेळचे **१९९१ ते १९९५ पर्यंत शिक्षण मंत्री** पण व्हिजन (दूरदृष्टी) नसलेले होते, **लाईफ स्किल्स का नाही शिकविले आमच्यासारख्या खूप एनर्जी असलेल्या युवकांना??** आयुष्यामध्ये धडधडायला सोडून दिले, स्वतःच्या पदांचे पाहिले फक्त.. आजची ४० वयातील पिढी त्रासात आहे ह्या असलेल्या मंत्रिपदावर फक्त बसून राहिलेल्या (जे काम करायला पद दिलेय ते योग्य न करता..) लोकांमुळे!!*

**संदेश क्रमांक २**

**मोठ्या माणसांना भेटताना भिऊ नये..**

*__जितका मोठा माणूस तितका चांगला वागतो हे लक्षात असू द्या..__ मानसिंग पवारसारखा योग्य काम करून मोठा झालेला माणूस चांगला असतो कायम !!*

**संदेश क्रमांक ३**

**कारण महत्त्वाचे असेल तर माणूस धडपड करतोच, भीती बाजूला ठेवून..**

*बाईक हे कारण होते म्हणून आईला भांड भांड भांडावे लागले तर भांडलो, बँकेत गेलो, मानसिंगजींना भेटलो!! __सगळे सहजगत्या केले...__*

*काहीतरी करण्यामागचे __कारण शोधा,__ कसे मिळवायचे तो मार्ग आपोआपच सुचेल, सापडेल!!*

*जर भांडण मोठे असेल, ताकतवर व्यक्तींसोबत योग्य मुद्द्यावर असेल तर सुचेल त्या दुसऱ्या ताकतवर व्यक्तींची मदत मिळवा, धडपड करा __पण योग्य मुद्याची लढाई हरू नका..__*

*राक्षसी प्रवृत्तीच्या (परिवारातील, बाहेरील) लोकांना योग्य वेळी ओळखा जेणेकरून तुम्हाला जे हवे, __जे योग्य आहे ते योग्य वेळी करता आले पाहिजे!!__*

## अजुन एक अनुभव...

### मुलाच्या डोक्यात वीट मारणारा वडील!! (मुलगा ७-८ वर्षांचा)

मागील काही महिन्यांत केलेल्या एका फेसबुक लाइव्हमध्ये मुलांच्या आयुष्यातील वडिलांच्या महत्त्वाबद्दल बोललो होतो.. ते नक्की बोध घेण्यासारखे आहे!! **नक्की पहा ते FB live..**

अशातच एका वडिलांना भेटलो.. रागाच्या भरात स्वतःच्या मुलाच्या डोक्यात वीट मारणार होते!! परवा मी कडबी मंडीकडे चाललो होतो. दुरून पाहिले की एका ८ वर्षाच्या मुलाचा हात पकडून एक माणूस वादावादी करत होता.. खूप रागात होता माणूस आणि माझी गाडी पोचेपर्यंत त्या माणसाने एक बुक्की मुलाच्या पाठीच्या कण्यावर मारली...**कणा मोडेल इतकी जोरात बुक्की होती ती..!**

आजून मारणार हे दिसत होते मला... शिवाला गाडी थांबवायला सांगितले, उतरलो गाडीतून आणि लहान मुलाला त्या माणसाच्या रागातून वाचवण्यासाठी धावलो.. तोपर्यंत त्या माणसाने बांधकाम चालू असल्यामुळे रस्त्यावर पडलेली वीट उचलली होती आणि उगारली पोरावर.. !!

**माणूस म्हणत होता,** "किती वेळापासून शोधतोय तुला!! लपून बसलास, पतंग उडवतोय!! आवाज दिला **तरी ऐकत नाही मुद्दाम.... मारू का??"**

तोपर्यंत मी हात पकडला होता काकांचा.. मी विचारले ,"काय झाले काका?? का एवढा राग?? कोणाचा पोरगा आहे हा?? **इतके का मारताय, मारू नये इतके!!"**

२-३ लोकं आली आणि वाचवत होती मुलाला, ती लोकं म्हणाली यांचा मुलगा आहे... तोपर्यंत काकाने होश संभाला था !!

**माझ्याकडे बघून म्हणाले," दुधगांवकर साहेब!! "... "बघा ना.. ३ तासापासून शोधतोय ह्याला!!।। मुद्दाम लपतोय खेळण्यासाठी। "..**

मनात म्हणालो मी, "अरे कशाचा साहेब!! काही वर्षांपूर्वी एक मुलगा म्हणून हाणामारीच्या त्रासातून गेलेला व्यक्ती म्हणून उतरलोय"... 😊 😊

मी," अहो पोरगा आहे तुमचा !! खेळणारच की तो, इतके मारू नये..."

इतक्यात पोरगा संधी पाहून पळून गेला घरी रडत रडत!!

**मी काकांना बोललो, काका पोरगा तुमचा, हक्क आहे तुम्हाला, पण मरेपर्यंत मारण्याचा नाहीं!!"**

"येतो मी काका" असे बोलून मी निघालो गाडीत, काका गेले घरी!! (पोराला घरी जाऊन अजून मारतील असे वाटले, जाताना त्यांच्याकडे बघत होतो तेव्हा)..

बऱ्याचदा आईचा खूप मार खाल्लेल्या मला, लहान म्हणून मार पडणाऱ्या हतबल मुलाला कसे वाटते हे चांगले माहिती आहे.. १९८७-१९८८ ला बाबांच्या पडत्या काळाची सुरुवात झाली आणि तेव्हाच आईने शेत घेतले होते... बाबांच्या परिस्थितीचा तसेच शेतांत लागणाऱ्या गुंतवणूकीचा त्रास होत होता बहुतेक... कारण माहिती नाही, पण मग काय करावे आईने??

**माझी** काही चूक सापडली की, रागात मारायचे... ४ वर्षे खुपदा जोरात मारल्यामुळे भिंतीवर आदळलेल्या, खुपदा मारलेल्या मला त्याचा अतोनात त्रास झाला .... **कोणीही वाचवायला आले नाही..**

एक मावशी तेव्हा बोलली (आईच्या माघारी) ते मला आठवते की "ताईने इतके नाही मारायला पाहिजे समीरला"... दुसरी मावशी हा **विषय आजही निघाला की म्हणते** की "हो खूप मारायची ताई समीरला !! "..

तेव्हा निहथ्या, हतबल असलेल्या समीरला रागाच्या भरात ठोकणाऱ्या आईच्या हातून वाचवायला कोणी काही बोलले नाही!! शूरवीर, महान शिवाजी महाराजांचे **अनुयायी म्हणवून घेणार पण पळपुटेपणा असलेले हे लोक!! अन्याय दिसतो पण नात्यामुळे बोलले नाही कोणी!!** का तर म्हणे माझी आई/ताई मोठी आहे, तिला तिची चूक कशी सांगा??

**बरोबर आहे का असे वागणं नातेवाईक लोकांचे?? काय वाटते मंडळी?**

**नॉर्वेसारख्या प्रगत देशांत अशा पालकांपासून** मुलांना सरकार दूर घेऊन जाते, कारण समजावून सांगण्याची **एकच पद्धत नसते - दादागिरी करणे, मरेपर्यंत मारणे, इत्यादी!!**

मुले फक्त आणि फक्त खऱ्या प्रेमाने आणि मुलांच्या आवडीनिवडी बघून त्यादिशेने मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींचेच ऐकतात.. **मारून नाही ऐकत!!**



**आस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी त्यांच्या संसदेत सांगितलं,** ''आपल्या देशाच्या शाळांमध्ये, प्रार्थना स्थळांमध्ये, सगळीकडे, मागील ३० वर्षांत लाखो करोडो लोकांवर त्यांच्या लहानपणीच्या आयुष्यात लैंगिक अत्याचार झालाय.. ह्या संस्था, शाळा, प्रार्थना स्थळं इत्यादी मुलांचे संरक्षण नाही करू शकला.. **आज देशाची आणि लैंगिक अत्याचार झालेल्या सर्वांची मी माफ़ी मागतो"**

**वा रे खूप प्रगती करून समृद्धी मिळवलेला हुशार देश !!** ३० वर्षे मुलांना संरक्षण नाही देऊ शकला **आणि म्हणे प्रगत देश !!**

### ह्यातून संदेश काय घ्यायचा?

**संदेश क्रमांक १**

सर्वांना विनंती की जवळच्या नातेवाइकाना सांभाळायला देव येत नसतो, देवाने ती जबाबदारी पालकांना आणि नातेसंबंध असलेल्या लोकांना दिली आहे..

**मुलींना प्रेमाने वाढवायचे आणि मुलांना गुंडागर्दी करीत मारत मारत वाढवायचे हे थांबवा!!** मुले फक्त आणि फक्त खऱ्या प्रेमाने आणि मुलांच्या आवडीनिवडी बघून त्यादिशेने मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तींचेच ऐकतात.. **मारून नाही ऐकत!!**

**संदेश क्रमांक २**

नवरा परिवाराकडे लक्ष देत नाही म्हणून त्याचा राग मुलांना मारून काढू नका.. अशा नवऱ्यालाच मारा !! **(गम्मत करतोय मंडळी...😜 😜 )**

असा नवरा असेल तर मुलाला लहानपणी प्रेमाने समजावून सांगा की "पोरा, तुझा बाप लै वाईट दर्जाचा स्वार्थी माणूस आहे.. **तुला तुझे तुझेच बघायचे आहे.."**

असे जर **प्रेमळ आईने** प्रेमाने खुपदा समजावून सांगितले की मुले ऐकतील आणि पटकन स्वावलंबी होतील.. पतिव्रता वगैरे मूर्खपणात जर मुलापासून लपवलेत खरे जे आहे ते, **तर परिवार बर्बाद होईल!!**

**संदेश क्रमांक ३**

**परदेशात पण परिवार आनंदी नाहीत. आपल्या संस्कृतीला धरून चला. प्रत्येकाचे मन सांभाळा, नुसतेच पैसा-पैसा करू नका..!!**

आपलाच,

**समीरभाऊ दुधगांवकर**



# समीर गणेशराव दुधगांवकर


**जन्म दिनांक : 03 August**

**: 98 202 30 402**

: SAMEERGD@gmail.com

**एक भूमीपुत्र**


- क्षितिजावरील उगवता सूर्य, युवकांचे रोल मॉडेल...
- राज्यस्तरावर काम करून करुलेले परभणीचे उगवते नेतृत्व...
- युवकांसाठी लाखमोलाचे उदाहरण, विकासाची दृष्टी असणारे...

- ✔ बी.ई. (मेकॅनिकल), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद.
- ✔ एम. एस. अमेरिका (मेकॅनिकल), "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" या उक्तीवर दृढ विश्वास म्हणून अमेरिकेत मिळालेली संशोधनाची पूर्णवेळ शिष्यवृत्ती नाकारून भारताच्या उभारणीसाठी भारतात परत
- ✔ एक नवीन शेतकरी आणि समृद्धी सल्लागार
- ✔ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा अध्यक्ष म्हणून लवकरच निवड होण्याचे अपेक्षित
- ✔ "महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर" चे उपाध्यक्ष म्हणून २०१४-१८ या काळात कार्यरत. १९२७ साली स्थापित चेंबर ही राज्याची एक शिखर संस्था आहे.

## समीरच्या व्यक्तिमत्वाबद्दल आणि सामाजिक कार्याचा सारांश...

- **दैवी शक्तीवर अपार विश्वास**
- **भगवतगीतेचा सन २००२ पासून अभ्यासक**
- **एक कट्टर देशभक्त, देशाच्या संस्कृतीवर अपार प्रेम**
- **एक निर्व्यसनी व्यक्तिमत्त्व,** नैतिक वर्तणूक आणि लोकाभिमुख कार्य करण्यासाठी तत्पर
- एक चांगला संवाद कौशल्य असणारा, एक वरदानप्राप्त वक्ता
- एक तंत्रज्ञानातील जाणकार व्यक्ती, जो एक प्रामाणिक आणि स्वच्छ प्रतिमेचा म्हणून जाणल्या जातो
- भारतीय तत्त्वज्ञान **व्यक्तिमत्त्वामध्ये खोलवर रुजलेले** असल्यामुळे तसेच **प्रामाणिकपणा आणि लोकांशी सुसंवाद साधण्याचे कौशल्य** यामुळे भेटायला येणाऱ्या **प्रत्येक व्यक्तीला समीरबद्दल आपुलकी व आत्मीयता वाटते**
- संघटनेचे ध्येय साधण्यासाठी वैयक्तिक गुण, नेतृत्त्वगुण आणि प्रेरणादायी क्षमतांनी सशक्त आहे
- **विकासातून मानवांमध्ये शांतता आणि समृद्धी प्रस्थापित करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या गटाचा एक भाग** म्हणून राहण्याची बांधिलकी आहे.

### समीरच्या कारकीर्दीचा सारांश... :-

- **सन २०१२ पासून** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे कार्यकारिणी समिती सदस्य.
- **तरुण वयातच** नेतृत्त्वगुणांची आणि औद्योगिक सहभागाची दखल घेऊन महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्षपदी दोन वेळेस बिनविरोध निवड.
- चेंबरच्या शैक्षणिक - औद्योगिक संबंध प्रस्थापित करण्यामध्ये पुढाकार, त्यातूनच महाराष्ट्र राज्यातील लाखो विद्यार्थ्यांशी संपर्क. **१०००० विद्यार्थ्यांच्या रोजगार निर्मितीसाठीची यंत्रणा बनविण्यासाठी चेंबरला तयार केले.**
- **सामाजिक उद्योजक** - वेगाने वाढणाऱ्या खालील उद्योगांचे मुख्य सल्लागार
  - शेती व शेतीवर आधारित उद्योग
  - व्यापार(रिटेल आणि इलेक्ट्रॉनिक्स) तसेच ई-कॉमर्स मध्येदेखील सक्रिय
  - मानव संसाधन सशक्तीकरण व्यवसाय
- सहसचिव/विश्वस्त ज्ञानोपासक शिक्षण मंडळ (स्थापना १९८३)

**या संस्थेच्या १२ हून अधिक शाखा असून १०,००० च्या वर विद्यार्थी आहेत**

### विशेष साध्य :-

१) समीर यांची यशोगाथा **ऑर्गनायझर** या मासिकात प्रकाशित झालेली आहे. (१६ ऑगस्ट २०१५ अंक)

२) देशाची संस्कृती जपण्याकरता उद्योजकता हा मार्ग आहे, हे ठामपणे सांगणारी **परभणीतील पहिलीच व्यक्ती**

३) तरुणांचे **सशक्तीकरण, उद्योजकता या विषयांवर बोलण्यासाठी टीव्ही व आकाशवाणीवर बऱ्याच वेळा निमंत्रित**

- झी २४तासच्या रोखठोक या कार्यक्रमामध्ये **हमाल पोस्ट ग्रॅज्युएट** या विषयावर एक उद्योग प्रतिनिधी म्हणून चर्चेसाठी निमंत्रित **https://www.youtube.com watch?v=Su22QDGLaUY&t=1359s**
- ऑगस्ट २०१६ ला आकाशवाणी परभणी मध्ये **उद्योग आणि भारतीय तरुण** या विषयावर बोलण्यासाठी निमंत्रित.
- **कार्यशाळांद्वारे** विद्यार्थ्यांचे सशक्तीकरण या विषयावरील मुलाखतीसाठी १७ डिसेंबर २०१३ रोजी परभणी **आकाशवाणीवर निमंत्रित**

४) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष म्हणून दोन वेळा (चार वर्षे) **बिनविरोध निवड**

५) चेंबरच्या कौशल्य विकासाच्या केलेल्या कामांबद्दल, चेंबरचे अध्यक्ष श्री राम भोगले यांनी **सन्माननीय मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते समीर यांचा सत्कार केला**

६) जानेवारी २०१५ आणि जानेवारी २०१७ मध्ये महाराष्ट्रातील युवकांचे अत्यंत प्रामाणिक सर्वेक्षण घडवून आणले

## सर्वेक्षण निष्कर्ष :-

● एकाहत्तर (७१) टक्क्यांपेक्षा जास्त युवकांना व्यावसायिक बनायचे आहे.

●या सर्वेवर आधारित आणि प्रमुख उद्योगांचा सल्लागार म्हणून, जुलै २०१७ मध्ये समीरच्या टीमने तयार केलेला **"तरुणांच्या उच्च दर्जाच्या उद्योजकता विकासासाठीचा प्रस्ताव"** महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारिणीने मान्य केला

७) एक राज्यस्तरीय बॅडमिन्टन खेळाडू, एक चांगला क्रिकेटपटू, टेबल टेनिस, कबड्डी, खो-खो खेळाडू.

## समीरची कौशल्य क्षेत्रे :-

● या आधुनिक जगात भगवद्गीतेच्या शिकवणीचा उपयोग नैतिक व यशस्वी आयुष्य जगण्यासाठी कसा करावा

● प्रबळ कौटुंबिक पद्धती आणि वैयक्तिक परिवर्तनासाठीची मूलतत्त्वे

● संघटना बांधणीची प्रक्रिया आणि लोकांमधील नेतृत्त्वगुणांचा विकास करणे

● लोकांना सर्वोच्च कामगिरीपर्यंत पोचण्यासाठी मदत करणे आणि कर्मचाऱ्यांची उत्तम नेतृत्त्वक्षमता बनवणे

● गरिबीच्या उच्चाटनासाठी Compassionate Capitalism

● यशस्वी होण्याच्या तत्त्वांवर आधारित व्यवस्थापकीय सल्लागारिता

## जनकल्याणासाठीचे प्रयत्न :-

● "भारतीय तत्वज्ञानावर आधारित कठीण परिश्रम आणि प्रामाणिक प्रयत्नांद्वारे व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये यशाचे शिखर गाठून महाराष्ट्रातील लाखो युवकांमध्ये **आदर्श निर्माण करून**" महाराष्ट्रातील लाखो युवकांना प्रेरित केले आहे.

● व्यवसायाचा सल्लागार म्हणून काम करून वरील गोष्टी साध्य केल्या आणि लवकरच **महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा अध्यक्ष म्हणून निवड होण्याचे अपेक्षित आहे.** देशाच्या युवकांपुढे उत्तम उदाहरण.

## एक टीम प्लेअर/ लीडर म्हणून...

● शेतकऱ्यांची प्रगती करण्यासाठी आणि ज्ञान वाढवण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन

● आधुनिक तंत्रज्ञानाविषयी तसेच शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करणे

● परभणीतील व्यापाऱ्यांसाठी राज्यस्तरीय कार्यक्रमांचे आयोजन करणे

● अभियांत्रिकीमध्ये करियर प्रोत्साहित करण्यासाठी आणि उद्योजकतेसंबंधी माहिती देण्यासाठी युवकांचे उद्योग भेटीचे (उदा. मराठवाडा ऑटो क्लस्टर) आयोजन

● तरुण, शेतकरी, महिला, खेळाडू, आत्महत्याग्रस्त कुटुंब इत्यादींच्या समस्या सोडविण्यासाठी अथक प्रयत्न

● **तरुणांना उद्योजकता आणि समृद्धी मिळविण्यासाठी प्रेरणा देणे** या प्रमुख ध्येयासहित व्यापार आणि उद्योगांच्या विकासासाठी पायाभूत गरजांमध्ये **सहभागासाठी चेंबरचे नेतृत्त्व केले.**

## समीरचे नामांकन :-

**SRTM विद्यापीठ, नांदेड**चे माननीय कुलगुरू यांच्याद्वारे-राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगांतर्गत संशोधन प्रकल्पांसाठी विद्यापीठस्तरीय प्रकल्प प्रस्ताव विश्लेषण समिती वर उद्योग प्रतिनिधी म्हणून

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स द्वारे**-

● महाराष्ट्र शासनाच्या शहरी उपजीविका योजना व्यवस्थापकीय समितीवर नेमणूक. शहरी गरीब (अर्बन - पुअर) युवकांना रोजगार किंवा व्यवसाय उभा करण्याची संधी प्राप्त करून देणे

● NULM अंतर्गत महाराष्ट्र शासनाची योजना

● जैन शिक्षण संस्था (वरळी,मुंबई) च्या व्यवस्थापकीय मंडळावर

● शिक्षणासाठीची राज्यस्तरीय CSR समिती, तंत्रशिक्षणाचे संचालक मंडळ (DTE), महाराष्ट्र शासन, CSR धोरणाच्या अंमलबजावणीसाठी (GR June 2014)

| महिना | माहिती | मुख्यत्वे फायदा कुणाचा |
|---|---|---|
| २०१७ पासून | परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागाला सहकार्य करण्यासाठी भारतीय जैन संघटने सारख्या संघटनांशी संलग्न | समाज |
| २०१२ पासून | शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन त्यातून हजारो शेतकऱ्यांना फायदा परभणी-हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीमाल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली. दरवर्षीचे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन औरंगाबादेत होईल याची व्यवस्था केली. | हजारो शेतकरी |
| २०१४ पासून | परभणीतील व्यापारी आणि व्यावसायिक समूदायांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन, GST विषयी मदत, सध्याच्या व्यवसायांसाठी भविष्यातील नियोजन | उद्योग क्षेत्र |
| २०१६ पासून | १०० हून जास्त गावांना स्वतःहून भेट दिली आणि भविष्यातील कार्य व समृद्धीसाठी गावकऱ्यांशी चर्चा | १०००० च्या वर नागरिक |
| जानेवारी २०१७ फेब्रुवारी २०१७ | विद्यार्थ्यांसाठी-तंत्र संस्थेसाठीच्या "वर्ल्ड बँक प्रोजेक्ट"चा भाग म्हणून DTE सोबतच्या सामंजस्य करारांच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यामध्ये सॉफ्ट स्किल्स आणि उद्योजकता विकास या विषयावर कार्यशाळा | ७००० च्या वर विद्यार्थी |
| जानेवारी २०१७ | विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणात चेंबरचे नेतृत्त्व केले (कार्यशाळेतील ४००० च्या वर विद्यार्थी) **सर्वेचा निष्कर्ष** : ७१% ते ८५% विद्यार्थ्यांना व्यवसायाचा मालक बनायचे आहे. | संपूर्ण देशाचे विद्यार्थी |
| फेब्रुवारी २०१६ | मेक इन महाराष्ट्र/इंडिया अंतर्गत चेंबरसह समीरच्या टीमने तयार केलेला सामंजस्य करार DTE ने मान्य केला. | राज्याचे सर्व तंत्र, वास्तुशिल्पी, हॉटेल व्यवस्थापन विद्यार्थी |
| मार्च २०१५ | महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाने चेंबरसह सामंजस्य करार केला | लाखो विद्यार्थी आणि मंडळाचे कर्मचारी |
| फेब्रुवारी २०१४ | विद्यापीठाच्या विनंतीवर शैक्षणिक-औद्योगिक सामंजस्य करार होण्यावर विशेष लक्ष दिले | SRT विद्यापीठ नांदेड येथील ८३,००० च्या वर विद्यार्थी/कर्मचारी |
| २०१४-१५ | चेंबरच्या सहकार्याने जीवन कौशल्य कार्यशाळेसाठी विद्यापीठाचे कुलगुरू आणि NAAC कमिटीसोबत काम करून कार्यशाळा घडवून आणल्या.. http://youtube/jr२pZstiSkM | विद्यापीठाच्या ३० संस्थांचे जवळ जवळ ३००० विद्यार्थी |

# समीरच्या यशाचे रहस्य

**माझ्या प्रिय परभणीकरांना आणि मराठवाड्याच्या जनतेला सप्रेम नमस्कार.....**

राज्य शिखर (व्यापार) संस्था महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर ह्या १९२७ स्थापित उद्योजकांच्या **नावाजलेल्या** संघटनेचा राज्य पातळीवर **उपाध्यक्ष (मराठवाडा विभाग)** म्हणून (२०१४-२०१८) काम करतांना सर्व उद्योजकांनी सहकार्य केले **ह्याकरिता त्या सर्वांचे आभार!!**

एका मोठ्या कंपनीच्या सल्लागारपदी झालेल्या माझ्या निवडीबद्दल माझ्या शाळकरी मित्रांनी मला अप्रतिम शुभेच्छा दिल्या. त्या शुभेच्छांत **बालमित्रांनी विचारलेल्या "कसे जमते रे हे तुला??" ह्या प्रश्नाचे उत्तर देणे जरुरी आहे.** जेणेकरून सर्व नवयुवकांना समजेल की, मला असे यश रुपी आशीर्वाद का मिळत आहेत? **ह्या उत्तरातून जर काहींना प्रेरणा मिळाली** आणि आजकालच्या अवघड वाटणाऱ्या काळात परिवारांना, युवकांना यशाचा योग्य **मार्ग सापडला तर मला छान वाटेल...** प्रत्येक परिवार वाचला तर देश वाचेल. शेवटी देश म्हणजे एका हद्दीत असलेल्या सर्व लोकांच्या परिवाराचा मिळून असलेला समूह.

**प्रेरणा चांगली असल्याशिवाय चांगले काम करणे कोणाला जमले आहे काय???**

## माझी प्रेरणा काय?

लहानपणी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल इतिहासाच्या पुस्तकातून प्रेरित होऊन मला असे वाटायचे की, **प्रामाणिक, निर्व्यसनी आयुष्य जगावे आणि खूप लोकांना मदत करावी... "हे राज्य व्हावे ही श्रींची ईच्छा!!"** असे छत्रपती शिवाजी **राजे कायम बोलायचे... हे आपणास माहिती असेलच... माहीत आहे ना?**

माझे अमेरिकेतील गुरु, ज्यांनी वैयक्तीक वापराकरिता आयुष्यात १२ विमाने खरेदी केली, **ज्यांच्या बँक खात्यात शेकडो करोड रुपये जमा असायचे**, ज्यांनी जगभरातील लोकांना **प्रामाणिकपणे काम करून, योग्य शब्द बोलून श्रीमंत व्हायचे शिकविले...** त्यांनी करोडो लोकांना तसेच मला पण अनेक गोष्टी शिकविल्या...

महाराष्ट्र चेंबरमध्ये श्री. मानसिंग पवार, श्री. रामचंद्र भोगले, श्री. बी. बी. ठोंबरे, आशिष पेडणेकर व विद्यमान चेंबर अध्यक्ष संतोष मंडलेचा ह्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतांनाही मी प्रचंड गोष्टी शिकलो...

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शब्दांतून प्रेरणा घेऊन, अमेरिकेतील मार्गदर्शकाकडून शब्दांच्या महत्त्वाबद्दल शिकून, **मेहनत करतांना, गेली ५ ते ७ वर्षे मी फक्त खालील प्रार्थना करत आलो आहे.**

## माझा self-talk-

**"हे ईश्वरा, मला चांगली तब्येत, परिवार आणि मार्गदर्शन देतोस त्याकरिता धन्यवाद.**

**क्षमावृत्ती, नम्रपणा, शांतपणा, कार्यतत्परता, एकाग्रता हे गुण मला देण्याकरता ईश्वरा तुझे आभार, ज्यामुळेच मी माझ्या आयुष्यात तुला अपेक्षित असलेले काम योग्य प्रकारे (Gracefully) करू शकत आहे.**

**देवा, मी तुला पूर्णपणे समर्पित करतो; जेणेकरून**

**मी अशा ठिकाणी जाईल जिथे मी जाणे तुला अभिप्रेत आहे;**

**तो व्यक्ती बनेल जो तुला अपेक्षित असेल,**

**असे शब्द बोलेल जे तुला माझ्याकडून बोलवून घ्यायचे आहेत,**

**आणि ते करेल जे तुला मी करावे असे अपेक्षित असेल.**

**देवा, तुला मला जे काही बनवायचे असेल तेच मला बनायचे आहे. तुझे खूप आभार देवा, की तू माझ्यामध्ये ओतप्रोत भरलेली सर्वोच्च गुणवत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करण्याची क्षमता वापरतोस; जेणेकरून तुझी सर्वांना समृद्धी देण्याची इच्छा पूर्ण करण्यास मला वापरतोस."**

गेली कित्येक वर्षे मी स्वतः अशी प्रार्थना करत असतो, ह्यातून **काम करतानाचा आत्मविश्वास** वाढतो... माझा विश्वास आहे की, मागची काही वर्षे मी अशी प्रार्थना करण्याने व भारतातील महान उद्योजक व्यक्तींच्या मार्गदर्शनाला **माझ्या मेहनतीची जोड देण्याने, "सर्वांकरिता समृद्धी" हा माझा उद्देश योग्य असल्याने ईश्वर मला दिवसेंदिवस चांगल्या संधींच्या लायक समजतोय..**

ज्याला कोणाला योग्य पद्धतीने यश मिळवायचे आहे त्यांनी पण **असे चांगले बोलले व भरपूर काम केले तर ते पण आयुष्यात जिंकत जातील असे मला वाटते...**

ज्यांना असे वाटते की, **मी इथे लिहिले आहे ते योग्य बोलतोय, करतोय, तर आपल्याला एक विनंती-**

**"या.... आपण सोबत काम करूया... खूप काम आहे.. आपले प्रयत्न भारतीय संस्कृतीत बसतील असे आणि लोकांच्या विकासाचेच असतील ही मी ग्वाही देतो..".**

- छत्रपती शिवाजी महाराजांनी ३०० वर्षांपूर्वी संपूर्ण जगाला शौर्य काय असते हे दाखवून दिले; ते जसे बोलायचे
- ज्या अमेरिकेतील २०,००० करोड पेक्षा मोठा व्यवसाय असणाऱ्या अब्जाधीशाने यश मिळवायचे जगाला शिकविले
- जो संदेश भगवतगीता व जवळपास सगळ्याच धर्मग्रंथांमध्ये दिला आहे (Refer - www.UGTG.in/JPG8.php)
- **जी मेहनतीची पद्धत** मला यश तसेच ईश्वरी आशीर्वाद मिळवून देण्यास मदतगार ठरली आहे, ती पद्धत जर नवयुवकांनी वापरली तर लवकरच परभणी आणि मराठवाडा खूप **पुढे नेण्यास आपल्याला निश्चित यश येईल...**



**या... चांगले बोलुया, सोबत काम करूया...**

**आपलाच,**

**समीर दुधगांवकर**

**ईश्वरकेंद्रित कर्मयोगी व्यक्ती**

**२००२ सालापासून भगवत गीता अभ्यासक.**

### अशा समीरचे, टीमचे परभणीसाठी, देशासाठीचे काय मनसुबे आहेत...?

# S.D. समृद्धी मंच अविरत.. प्रयत्नरत... सर्वांच्या उत्कर्षासाठी..!

**Our Mission Statement :** To create equal opportunities for each section of the society and creating prosperity for all via empowering help & imparting appropriate skills and education. To do this through inclusive growth, with ultimate purpose of everyone's well being.



माझा परिचय देताना मी **सर्वांना सांगतो की, मी शिवाजी महाराजांचा अनुयायी आहे.** त्यांचा खूप मोठा **प्रभाव** माझ्यावर आहे. **छत्रपतींनी जे रयतेसाठी केले तशाच प्रकारचे काम मला करायचे आहे.** आणि त्याच अनुषंगाने, निरंतर कार्य करण्याच्या दृष्टीने आमच्या टीमने **एस.डी. समृद्धी मंच**ची घोषणा केली. लोकांनी लोकांसाठी बनवलेला मंच म्हणजे एस.डी. समृद्धी मंच ज्याचे ब्रीदवाक्य आहे **अविरत प्रयत्नरत सर्वांच्या उत्कर्षासाठी.** या समृद्धी मंच बद्दल थोडंसं ....

इतिहास साक्षी आहे की जेव्हा जेव्हा लोक एकत्र आले, तेव्हा तेव्हा क्रांती घडून आली आहे. या एस.डी. समृद्धी मंच ची पार्श्वभूमी व विचारधारा खालील उदाहरणांमधून तुम्हाला लक्षात येईलच..

## १.कौशल चक्र

याची सुरवात २५०० वर्षांपूर्वी वैशाली राज्यात झाली. मगध राज्याचा राजा अजातशत्रू वैशाली नगरीवर आक्रमण करु इछित होता. त्यापूर्वी तो आशिर्वाद घेण्यासाठी गौतमबुद्ध यांच्याकडे गेला. गौतमबुद्ध यांनी आशिर्वाद देण्यापूर्वी एक प्रश्न विचारला की **"मी असं एकले आहे की वैशाली राज्यात गावागांवात कौशल चक्र लागू आहे."**

**अजातशत्रू :** हो. माझी गुप्तचर यंत्रणा पण असंच सांगते.

**गौतम बुद्धः** मग माझा आशिर्वाद तुझ्यासाठी उपयोगी नाही कारण जिथे पाच पेक्षा अधिक लोक चांगल्या हेतूने एकत्र येतात **त्यावर ईश्वराची कृपा होते.**

अजातशत्रूला पुढे १० वर्षे लागतात कौशल चक्र यंत्रणा मोडायला.

**कौशल चक्र म्हणजे** कमीत कमी ५ ते २१ लोकांचा समूह जे एकत्र येऊन गावाच्या, शहराच्या विकासासाठी विचार करतात आणि सर्वानुमते घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करतात.

२. १९६२ ला **इशिकावा** नावाच्या इंजिनियर ने जपान उद्योगात क्रांति घडवून आणली. त्या पूर्वी जपानी मालाची स्थिती कांही वर्षांपूर्वी दिल्ली मेड व आजच्या चायना मेड सारखी होती. जपानमध्ये १९६२ नंतर ५ लाख क्वालिटी सर्कल तयार झाले आणि १९६२ ते १९९२ या ३० वर्षांत जपान एक सुपर इकॉनॉमिक पॉवर झाला.

३. बचतगटाच्या संकल्पनेचे जनक, नोबेल पारितोषिक विजेते, ग्रामीण बँकचे संस्थापक, अर्थशास्त्राचे प्रोफेसर **मोहम्मद युनूस** यांनी अमेरिका येथून नुकतीच पीएच. डी. घेतली होती आणि बांगलादेश येथे विश्व विद्यालयात नौकरी करत असताना बांगलादेशमध्ये दुष्काळ पडला होता. मी जे शिकवतो आणि आजूबाजूची परिस्थिती यात खूप तफावत आहे, याची त्यांना प्रकर्षाने जाणीव होत होती. **मी काही करू शकतो का?** म्हणून महम्मद युनूस यानी स्वतःच्या जबाबदारीवर बँकेला कांही लोकाना कर्ज द्यायला लावले. लोकानी कर्ज फ़ेड़ले. मग एका गावाला नंतर पाच, दहा, पन्नास ,शंभर आणि २ ऑक्टोबर १९८३ ला ग्रामीण बँक स्थापण्यात आली. आज ही बँक बांगलादेशात ४६००० गावात काम करते व तिच्या १२६७ शाखा आणि १२००० कर्मचारी आहेत. लाखो लोकांना सावकारांच्या तावडीतून या बँकेने मुक्त केले.

४. शेवटचं **उदाहरण आपल्या सर्वांच्या जवळचं आणि आपुलकीचं.** ते म्हणजे **छत्रपती शिवाजी महाराज.** मावळ्यांना एकत्र करून त्यांनी उभारलेल्या स्वराज्याबद्दल आपणा सर्वांनाच माहिती आहे.


या सर्व गोष्टींचा विचार केला **तर आपणही एकत्र येऊन** आपल्या भागासाठी काहीतरी चांगले करू शकतो असे आम्हाला वाटते. आणि याच उद्देशाने **"एस. डी.समृद्धी मंच"** ची स्थापना केली आहे. गावातील लोकांनी एकत्र येऊन आमच्या मदतीने आपल्या गावाच्या समृद्धीसाठी अविरत प्रयत्न करावे, हा यामागचा उद्देश. मला खात्री आहे की **सर्व चांगल्या लोकांच्या समृद्धीसाठी** लोक नक्कीच एकत्र येतील आणि सर्वस्तरावर प्रयत्न करण्याचा आपला मनसुबा आहे. **आपल्याही गावात एस.डी. समृद्धी मंच स्थापन करावा. संपर्क - 9422 93 64 60**

**जास्तीत जास्त लोकांचे भले व्हावे, या हेतूने माझी मते, विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी मेसेजद्वारे सर्वांना पाठवत असतो. आपल्यालाही माझे मेसेज यावे, असे वाटत असल्यास कृपया माझा 98 202 30 402 हा संपर्क क्रमांक आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह करून घ्यावा आणि सेव्ह केल्यानंतर मला नाव, गाव लिहिलेला व्हाट्सॲप वर मेसेज करावा.. ऑडीओ, व्हिडीओ तसेच शब्दांच्या माध्यमातून मी माझे विचार आपल्या व्हाट्सॲपपर्यंत पोहोचवत राहील.. आपल्या फोनमध्ये नंबर सेव्ह नसेल तर मी पाठवलेला मेसेज आपल्या मोबाईलमध्ये डिलिव्हर नाही होणार....**



# निवेदन आणि विनंती..





खेड्यापाड्यांतल्या लोकांना आम्ही मदतीस आहोत, हे समजावत फिरताना काही युवकांनी मला प्रश्न विचारला की, **"समीरभाऊ लोकसभा लढवणार का?"(माझ्या फेसबुकवर ती चर्चा नक्की वाचा !!!) सर्वांना आम्ही येथे ठामपणे सांगतो की, आम्ही काय काय करणार..?**

- लोकांच्या आशीर्वादाने स्वतःच्या चांगल्या कामाच्या जोरावर (फक्त घरच्यांच्या नावावरच नाही तर स्वतःच्याही कामामुळे आणि परिवाराच्या प्रामाणिकतेच्या उदाहरणामुळे, पुण्याईमुळे) **स्वतः लोकप्रतिनिधी बनणार**, अजून काही लोकं लोकप्रतिनिधी बनवणार **आणि मिळून देश घडवण्याचे काम करणार..**
- खूप जणांना **कर्तव्यदक्ष सरकारी अधिकारी** बनवून **त्यांना लोकप्रतिनिधींना मदत करायला तयार करणार..**
- खूप शेती आधारित उद्योग करणारे घडवणार. तसेच जालना येथील ड्रायपोर्ट, डीएमआयसी **ह्या उद्योगांच्या विकास संधींचा फायदा घ्यायला एका पिढीला तयार करणार...**
- **युवकांमधले देवाने दिलेले गुण युवकांना ओळखायला मदत करणार आणि** यातून अभूतपूर्व नवीन पिढी हसत खेळत घडवणार...

**कारण आम्हाला लोकांच्या समृद्धीसाठी काम करायचे आहे... आणि सध्याचे जे चांगले लोकप्रतिनिधी आहेत त्यांना आम्ही नक्कीच सहकार्य करू.** परभणी लोकसभेला शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या पुढे नेण्यासाठी **हवे ते सर्व प्रयत्न** आमच्या टीमच्या मार्फत करणार आहोत.. **आवडतील ना आपणास असे प्रयत्न??**

इतक्या वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ही ₹ १७० लाख कोटींपर्यंत पोचली.. जाणकारांचे म्हणणे आहे की पुढच्या **१० वर्षांत भारताची अर्थव्यवस्था ही दुप्पट म्हणजेच ₹ ३४० लाख कोटींची अर्थव्यवस्था होणार..** आतापर्यंतच्या अर्थव्यवस्थेत परभणी शेतमालाच्या उत्पन्नाशिवाय खूप सहभागी नव्हती... **पण दुप्पट होणाऱ्या अर्थव्यवस्थेत परभणीकर सहभागी होतील - हे करायचे आहे..!!**

जरी अर्थव्यवस्था दुप्पट होणार असली तरी दुसऱ्या बाजूला आज खूप लोक कमी वयातच आजारपणाने मरत आहेत.. मुलं व्यसनाधीन होत आहेत.. **टीव्ही, सोशल मीडिया लोकांच्या मेंदूवर नियंत्रण ठेवत आहेत**, लोक स्वतःचा मेंदू फार न वापरता आयुष्य जगत आहेत... घराघरांमध्ये आई-वडील-मुलं-भावंडं हे एकमेकांना त्रास देत आहेत, त्यांच्यात भांडणं होत आहेत... जागतिक बँकेचा अहवाल सांगतो की अशा अजुन बऱ्याच गोष्टींतून पुढील दहा वर्षात **₹ ५१० लाख करोडचे नुकसानही भारतीय अर्थव्यवस्थेला होणार आहे, ते तर वेगळेच...!** ही परिस्थिती आपल्या भारत देशाच्या संस्कृतीला नक्कीच साजेशी नाही. कुठलीही सुजाण व्यक्ती हे असेच घडत रहावे हे मान्य करणार नाही **आणि आम्ही तर मुकाट्याने नक्कीच बघत बसणार नाही...**

या सर्व गोष्टींवर उपाय सापडलायसुद्धा, परंतु हे सर्व आम्ही एकटे नक्कीच करू शकत नाहीत. **पुढच्या काही महिन्यांत आम्हाला अशा १२०० लोकांची आवश्यकता आहे, जे या नुकसान करणाऱ्या गोष्टी थांबवण्यासाठी सर्वस्वी प्रयत्न करतील..** हे सर्वस्तरावरील काम करत असताना जर आम्ही आमच्या परिवारातील किंवा ओळखीतील लोकांनाच प्राधान्य दिले **तर होतकरू युवकांवर अन्याय केल्यासारखा होईल. त्यामुळे ज्या प्रामाणिक, मेहनती लोकांना हे सर्व वाचुन असे वाटत असेल की** आमच्यासोबत काम करून आपण नक्कीच स्वतःची आणि परभणी लोकसभेची समृद्धी वाढवू शकू, अशा सर्वांना **एक जाहीर निवेदन की, या पुस्तिकेतील माहितीचा आप्तेष्टांत प्रसारही करावा आणि आम्हाला संपर्क करावा. एक टीम म्हणून आपण नक्कीच परभणी लोकसभेचा कायापालट करू शकू.**

ज्या जुन्या-नव्या लोकांनी आजपर्यंत प्रामाणिकपणे आम्हाला साथ दिली आहे, ज्यामुळेच दुधगांवकर परिवाराला १९९०च्या दशकाच्या **मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीपर्यंत** पोचायला मदत झाली त्या सर्व आप्तेष्टांचे आभार...!! जुन्या साथीदारांना, त्यांच्या पुढच्या पिढीतील युवकांना तसेच जे कधी दुधगांवकर परिवारासोबत नव्हते **त्यांनाही आमच्यासोबत जुळण्यासाठी मी आवाहन करतो...**

तुम्ही आज कुणाच्या पाठीमागे आहात आम्हाला माहित नाही; परंतु एकच विनंती की अशिक्षित, असमंजस, भ्रष्ट, फक्त स्वतःच्याच मुलांचे भले करणाऱ्या, चुकीच्या व विकासदृष्टी नसलेल्या नेत्यांच्या **मागे फिरून आपला वेळ, पैसा आणि भविष्य वाया घालवू नका.** माझ्याबद्दलच्या ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत जसे म्हणले आहे की, **All it takes for evil men to triumph is for good people to sit back and do nothing...** ज्यांनी विकास केला नाही, काम करणाऱ्याला मागे पाडले अशा नेत्यांसोबत, (Evil) लोकांसोबत काम करण्यापेक्षा, आमच्या टीमसोबत या आणि आपण चांगले विचार असलेले, इच्छा असलेले (Good people) सगळे मिळून बदल घडवून आणूया..

**जसं गौतम बुद्धांनी सांगितलं आहे की,** जेथे पाच पेक्षा अधिक लोकं चांगल्या कामासाठी एकत्र येतात **त्यावर ईश्वराची कृपा होते.** त्याचप्रमाणे **भागवत गीतेमध्येही लिहिलेले आहे की,** जेव्हा माणसे देवासोबत सहकार्य करायला लागतात तेव्हा सर्वांना समृद्धी नक्कीच मिळते. **मग या ईश्वरी शिकवणीतून दिसते की,** चांगल्या कामासाठी एकत्र येणाऱ्यांचा, चांगल्या उद्देशासोबत सहकार्य करणाऱ्या लोकांचा ईश्वरी कृपेने विजय पक्का आहे. **म्हणून जिंकणाऱ्या टीममध्ये या...!! आवडेल ना चांगले काम करणाऱ्या, जिंकणाऱ्या टीमचा हिस्सा व्हायला??**

आपलाच,

**समीरभाऊ दुधगांवकर आणि टीम !!**

**९८ २०२ ३० ४०२**

वक्तृत्व ही दैवी देणगी लाभलेला
कर्तृत्ववान व्यक्ती...

नावाजलेल्या संस्थांमधील उच्चशिक्षित,
प्रगल्भ, नेतृत्वगुण संपन्न...

परभणीच्या सर्वांगीण विकासासाठी
एकमेव आशास्थान....



समीर दुधगांवकर M.S. USA
ज्ञानोपासक महाविद्यालय,
जिंतूर रोड, परभणी 431 401
98 202 30 402

'समीर दुधगांवकर' फेसबुक पेज
लाईक करा.. जेणेकरून कामाबद्दल
माहिती मिळत राहील....